# गोरा

**रविंद्रनाथ टागोर**

अनुवाद

**उज्ज्वला केळकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**गोरा :** रविंद्रनाथ टागोर
अनुवाद : उज्ज्वला केळकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
उज्ज्वला केळकर
१७६/२, 'गायत्री', प्लॉट नं. १२,
वसंतदादा साखर कामगार भवनजवळ,
सांगली- ४१६४१६
फोन नं. ०२३३-२३१००२० मो. नं. : ९४०३३१०१७०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४००/-

# १

श्रावण महिन्यातली सकाळ. ढग हटल्याने स्वच्छ निर्मळ उन्हाने आकाश भरून गेलंय. रस्त्यावरून घोडागाड्या धावताहेत. फेरीवाले आपला माल विकण्यासाठी सातत्याने ओरडताहेत. ज्यांना शाळा, कॉलेज, कचेरीत जायचंय त्यांच्या घराघरांतून मासळीची भाजी तयार होते आहे. स्वयंपाकघरातील शेगडीतून धूर येतोय. तरीही या मोठ्या, कार्यरत असलेल्या कलकत्ता शहरातील रस्त्यातून, गल्ल्यांतून जशी काही अपूर्व यौवनाचा प्रवाह घेऊन प्रकाशधारा वाहते आहे.

अशा वातावरणात विनयभूषण आपल्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरील व्हरांड्यातून एकटाच उभा राहून रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे पाहतोय. त्याचं कॉलेजचं शिक्षण कधीच पूर्ण झालंय; पण अद्याप तो संसारात पडलेला नाही. सभा-समित्यांत भाग घेणं आणि वर्तमानपत्रात लिहिणं यातच तो सध्या व्यस्त आहे. तथापि त्याचं मन यात रमून गेलंय, असं काही निश्चितपणे सांगता येणार नाही. आता सकाळी काय करावं, याच विचारात तो आहे.

शेजारच्या छतावर तीन-चार कावळे कशासाठी काव काव करताहेत, कुणास ठाऊक? त्याच्या व्हरांड्याच्या कोपऱ्यात चिमण्यांची एक जोडी चिवचिव करत घरटं बांधण्यासाठी एकमेकांना प्रोत्साहन देत आहे. असे अनेक अस्फुट स्वर विनयच्या मनात अस्पष्ट भाव जागवताहेत.

जवळच्या एका दुकानासमोर एक फाटके तुटके कपडे घातलेला बाउल* अंगात कफनीसारखे एखादे पायघोळ वस्त्र, हातात एकतारी, कमरेवर डुग्गी नावाचं वाद्य, मुखात देहतत्त्वाची, राधा-कृष्णाची किंवा गौरांग प्रभूंची गाणी अशा थाटात हे बाउल बंगालच्या खेड्यापाड्यातून फिरताना दिसतात.) उभं राहून गाऊ लागलाय.

* बाउल हा बंगालमधील एक संप्रदाय आहे. १९ व्या शतकात याने शिक्षित लोकांचे लक्षही आपल्याकडे वेधून घेतले. वैष्णव आणि सूफी पंथांच्या विचारांचा मिलाफ या संप्रदायात झालेला दिसतो. नवद्वीप किंवा नादिया हे बंगालमधले ठिकाण यांचे मुख्य केंद्र आहे.

खांचार भितर अचिन पाखि कमने आसे याय
धरते पारले मनोबोडि दितेम पाखिर पाय*

विनयला वाटलं, त्याला बोलवून अज्ञात पक्ष्याचं हे गाणं लिहून घ्यावं; पण आळसाने त्याने त्याला बोलावलंही नाही नि गाणंही लिहून घेतलं नाही. अज्ञात पक्ष्याचा तो सूर मात्र त्याच्या मनात गुंजत राहिला.

अचानक त्याच्या घरासमोर एक बग्गी, एका घोडागाडीला टक्कर देऊन, त्याचं चाक तोडत वेगाने निघून गेली. घोडागाडी उलटली नाही; पण एका बाजूला कलंडली.

विनय लगबगीने रस्त्यावर आला. गाडीतील सतरा-अठरा वर्षांची एक मुलगी खाली उतरली होती. आत बसलेल्या एका प्रौढ व्यक्तीला ती उतरवण्याचा प्रयत्न करत होती. विनयने आधार देऊन त्या व्यक्तीला खाली उतरवलं आणि विचारलं, ''कुठे लागलं तर नाही?''

''नाही... नाही... विशेष काही झालं नाही.'' असं म्हणत ते हसण्याचा प्रयत्न करू लागले; पण तेवढ्यात त्यांचं हसू गायब झालं आणि ते मूर्च्छित झाले. विनयने त्यांना धरलं आणि घाबरलेल्या त्या मुलीला म्हटलं, ''माझं घर समोरच आहे. आत चला.''

आत येऊन त्याने त्या पुरुषाला बिछान्यावर झोपवलं. मुलीने खोलीत सगळीकडे पाहिलं. खोलीच्या एका कोपऱ्यात तिला सुरई दिसली. तिने त्यातील पाणी ग्लासमध्ये ओतून पुरुषाच्या चेहऱ्यावर त्याचे शिंतोडे उडवले आणि आपल्या पदराने त्याला वारा घालत विनयला म्हणाली,

''एखाद्या डॉक्टरला बोलावणार का?''

डॉक्टर जवळच राहत होते. त्यांना बोलावण्यासाठी त्याने एका नोकराला पाठवले. खोलीत एका टेबलावर एक आरसा, तेलाची बाटली, कंगवा वगैरे सामान ठेवलेलं होतं. विनय मुलीच्या मागे उभा राहून एकटक आरशाकडे पाहात होता.

विनय लहानपणापासूनच कलकत्त्यात, घरीच लिहा-वाचायला शिकला होता. या जगाचा त्याला जो काही परिचय होता, तो पुस्तकामार्फतच होता. परक्या सभ्य स्त्रियांशी त्याचा परिचय कधीच झाला नव्हता.

---

* काचेच्या पिंजऱ्यात या, येणे-जाणे
नवलाईच्या मनपक्ष्याचे
कधी येतसे कधी जातसे
कळले जर का मजला
बांधून न ठेवीन का, पायही त्याचे

आरशाकडे एकटक बघताना त्याच्या लक्षात आलं, ज्या चेहऱ्याचं प्रतिबिंब त्यात पडलंय तो चेहरा सुरेख आहे. स्नेहाने झुकलेल्या त्या चेहऱ्यावर काहीसे बेचैन भाव होते. चेहऱ्यावरील कोमलता आणि एक आगळीच चमक यामुळे तो विस्मितसा झाला.

थोड्या वेळाने त्या प्रौढ व्यक्तीने हळूहळू डोळे उघडले आणि 'आई' असं म्हणत दीर्घ श्वास घेतला. तरुणीचे डोळे भरून आले. त्याच्या चेहऱ्याजवळ आपला चेहरा नेत तिने विचारले, ''बाबा, कुठे लागलं-बिगलं तर नाही?''

''मी कुठे आहे?'' असं विचारत त्याने बसण्याचा प्रयत्न केला.

''उठू नका... आरामात पडून राहा... डॉक्टर येताहेत.'' विनय म्हणाला.

असं म्हणेपर्यंत त्यांना सगळं आठवलं. ते म्हणाले,

''डोक्यात थोडं दुखतंय. बाकी विशेष काही नाही.''

एवढ्यात बुटांचा कर्र कर्र आवाज करत डॉक्टर आले. त्यांनी त्या व्यक्तीला तपासलं. मग म्हणाले, ''विशेष काही झालं नाही. गरम दुधात थोडं औषध घालून द्या.''

डॉक्टर निघून गेले. तो वृद्ध उठण्याचा प्रयत्न करू लागला. मुलगी म्हणाली, ''बाबा, तुम्ही कशाला काळजी करता? डॉक्टरांची फी आणि औषधांचे पैसे घरी गेल्यावर पाठवून देऊ.'' असं म्हणताना तिने विनयकडे पाहिले.

कसे आश्चर्यभारित होते ते डोळे! ते मोठे होते की छोटे, काळे की भुरे, असा प्रश्न मनात आलाच नाही. पहिल्या नजरेत जाणवलं ते असं की, त्या डोळ्यांचा नि:संदिग्ध असा प्रभाव आहे. त्यात संकोच वा दुविधा नाही. एका स्थिर शक्तीने ते भरलेले आहेत.

विनयला सांगावंसं वाटलं, 'डॉक्टरांची फी मामुली आहे... त्यासाठी... त्याची आपण... ती मी.'

मुलीचे डोळे त्याच्यावर खिळले होते. त्यामुळे आपलं म्हणणं तो नीटपणे मांडू शकला नाही; परंतु फीचे पैसे त्याला घ्यावेच लागतील, याबद्दल त्याच्या मनात संदेह उरला नाही.

वृद्ध गृहस्थ म्हणाला, ''मला औषधाची आवश्यकता नाही.'' मुलगी म्हणाली, ''बाबा, डॉक्टर सांगून गेलेत.''

वृद्ध म्हणाला, ''डॉक्टर लोक असं सांगतच असतात. त्यांना तशी सवयच असते. मला जो थोडासा अशक्तपणा वाटतोय, तो दुधाने ठीक होऊन जाईल.''

गरम दूध पिऊन स्वत:ला सांभाळत वृद्ध गृहस्थ म्हणाला, ''आता आम्ही चलतो. आपल्याला खूप त्रास दिला.''

मुलीनं विनयकडे बघत म्हटलं, ''एखादी गाडी ...''

वृद्ध संकोचत म्हणाला, ''त्यांना कशाला सांगतेस? आपलं घर जवळच तर आहे. चालत जाऊ.''

मुलगी म्हणाली, ''नाही बाबा, असं नको...''

वृद्ध त्यावर काहीच बोलला नाही. विनय स्वत: जाऊन घोडागाडी घेऊन आला. गाडीत चढण्यापूर्वी वृद्धाने विचारले,

''आपलं नाव काय?''

''माझं नाव विनयभूषण चट्टोपाध्याय आहे.''

वृद्ध म्हणाला, ''माझं नाव परेशचंद्र भट्टाचार्य. जवळच ७८ नंबरच्या घरात राहतो. सवड असेल तेव्हा आमच्याकडे या. आम्हाला खूप आनंद होईल.'' मुलीने आपली नजर वर उचलून या आग्रहाच्या विनंतीला मूक समर्थन दिलं.

विनय तर त्यांच्या बरोबरसुद्धा जायला तयार होता; परंतु ते शिष्टाचाराला धरून होईल की नाही याबाबत त्याला निर्णय घेता येईना आणि तो तसाच उभा राहिला. गाडी निघाली, तेव्हा त्या मुलीनेही विनयला नमस्कार केला. यासाठी त्याच्या मनाची तयारी झालेली नव्हती. त्यामुळे तो तसाच हैराण होऊन उभा राहिला. त्याने काहीच उत्तर दिलं नाही. मग मात्र घरात आल्यावर आपल्या या चुकीबद्दल तो स्वत:लाच धिक्कारत राहिला.

या लोकांची भेट झाल्यापासून त्यांना निरोप देईपर्यंतच्या आपल्या वागण्याचं विनयने विश्लेषण केलं. त्याला वाटलं, आपलं वागणं काहीसं असभ्यपणाचं झालं. काय करायला हवं नि काय नको हे आपल्याला नीटसं कळलंच नाही.

खोलीत परतल्यावर त्याला आपल्या बिछान्यावर त्या मुलीचा रुमाल दिसला. त्या रुमालाने तिने आपल्या वडिलांचा चेहरा पुसला होता. त्याने पटकन तो उचलला. बाउलच्या गाण्याचे स्वर त्याच्या मनात गुंजत होते.

'खांचार भितर अचिन पाखि कमने आसे याय.'

दिवस वर चढला. पावसाळ्यातील ऊन कडक झालं होतं. कार्यालयाच्या दिशेने गाड्यांच्या रांगा धावत होत्या. विनयचं लक्ष कुठल्याच कामात लागत नव्हतं. एक प्रकारचा अपूर्व आनंद आणि तशीच वेदना या दोन्ही गोष्टी एकदमच आपल्या आयुष्यात तो प्रथमच अनुभवत होता.

ज्या राज्यात असंभव ते संभव होतं, असाध्य ते साध्य होतं, रूपातीत रूप घेऊन येतं, अशाच कुठल्या तरी नियमरहित राज्यात विनय भटकत होता. पावसाळ्यातील सकाळच्या उन्हाची चमक त्याच्या मनात पसरली होती.

विनयला वाटलं, आपल्यातील परिपूर्णता कोणत्या प्रकारे त्यांच्यापर्यंत पोहोचवायला हवी होती? त्याने आपली ओळख अगदी सामान्य व्यक्तीसारखी दिली होती. छोटंसं घर, त्यात इकडे तिकडे पडलेला पसारा, बिछाना साफसूफ नाही. नेहमी फ्लॉवरपॉटमध्ये ताजी फुलं असायची; पण त्या दिवशी तीही ठेवलेली नव्हती.

सगळे म्हणतात, विनय सभेत असं बोलतो की, एक दिवस तो खूप मोठा वक्ता होईल; पण त्या दिवशी आपल्या बुद्धीची काही चमक दिसेल, असं काही बोलायला त्याला सुचलंच नाही. त्याला सारखं वाटायचं, बग्गी घोडागाडीला टक्कर देऊ लागलीय आणि तो अतिशय वेगाने खाली धावत जाऊन त्या उद्दाम घोड्यांचे लगाम धरतोय. आपल्या या काल्पनिक शौर्याची प्रतिमा त्याच्या मनापुढे उभी राहिली, तेव्हा आरशापुढे उभं राहून आपलं प्रतिबिंब न्याहाळण्याचा मोह त्याला आवरला नाही.

एवढ्यात त्याला सात-आठ वर्षांचा एक मुलगा रस्त्यावर उभा राहून आपल्या घराचा नंबर न्याहाळतोय असं दिसलं. मुलगा त्याचंच घर शोधत होता. तो वरूनच म्हणाला, ''हेच घर आहे. ये.''

चपलांचा फटफट आवाज करत विनय वेगाने जिन्यावरून खाली उतरला आणि मोठ्या प्रेमाने त्याला घरात घेऊन आला.

''ताईने मला पाठवलंय.'' असं म्हणत त्याने विनयच्या हातात एक पाकीट दिलं.

विनयने पाहिलं. पाकिटावर त्याचं नाव लिहिलेलं होतं. आतमध्ये पत्र-चिठ्ठी काही नव्हती. केवळ काही रुपये होते. मुलाचा चेहरा बहिणीच्या चेहऱ्याशी मिळताजुळता होता. रंग थोडा सावळा होता, एवढंच.

मुलगा मोठा तरतरीत होता. खोलीत शिरताच भिंतीवर लावलेला फोटो बघून तो म्हणाला, ''हा कुणाचा फोटो आहे?''

विनय म्हणाला, ''माझ्या एका भावाचा फोटो आहे.''

''भावाचा फोटो? कोण आहेत आपले बंधू?''

''तुला माहीत नाहीत ते! त्यांचं नाव गौरमोहन. त्यांना मी 'गोरा' असंच म्हणतो. आम्ही लहानपणापासून एकत्रच शिकलो.''

''अजूनही शिकता आहात?''

''नाही. आता आणखी शिकत नाही.''

''आपलं सगळं शिक्षण झालं?''

या छोट्या मुलासमोर गर्व करण्याचा लोभ विनय आवरू शकला नाही. तो म्हणाला, ''हो. सगळं शिक्षण झालं.''

मुलाने एक दीर्घ श्वास घेतला. जणू विचार करत होता. एवढं शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्याला किती दिवस लागतील?

''तुझं नाव काय?'' विनयने विचारले.

''सतीशचंद्र मुखोपाध्याय.''

''मुखोपाध्याय?'' विनयने आश्चर्याने विचारले.

मग त्याच्याशी थोडं थोडं बोलत विनयला त्यांच्या कुटुंबाविषयीची सगळी माहिती कळली. परेशबाबू त्याचे वडील नव्हते. त्यांनी या दोघा बहीण-भावांना लहानपणापासून वाढवलं होतं. ताईचं नाव आधी 'राधाराणी' होतं. परेशबाबूंच्या पत्नीने ते बदलून 'सुचरिता' असं ठेवलं. बघता बघता विनय आणि सतीश यांचं छान जमून गेलं.

सतीश उठून घरी जायला निघाला, तेव्हा विनय म्हणाला, ''एकटाच जाणार?''

''मी नेहमी एकटाच जातो.''

विनय म्हणाला, ''चल, मी तुला पोहोचवतो!''

आपल्या शक्तीवर विनयचा अविश्वास बघून तो काहीसा खिन्न झाला. ''मी एकटा जाऊ शकतो!'' आपण एकटे जात असल्याची अनेक विस्मयकारी उदाहरणे त्याने दिली, तरीही विनय त्याच्या घरापर्यंत का आला, हे काही त्याला कळले नाही. तिथे पोहोचून विनय परत निघाला, तेव्हा सतीश म्हणाला,

''हे काय, आपण आत नाही येत?''

आपल्या मनाला कसंबसं काबूत ठेवत विनय म्हणाला, ''पुन्हा कधीतरी येईन.''

घरी परतल्यावर विनयने पत्ता लिहिलेलं ते पाकीट काढलं आणि खूप वेळपर्यंत त्याच्याकडे बघत बसला. मग रुपयांसहित त्याने ते पाकीट काळजीपूर्वक पेटीत ठेवले. आता ते पैसे खर्च होण्याची काही शक्यता राहिली नाही.

## २

वर्षा ऋतूतील संध्याकाळ. अंधार अधिकच गडद झालाय. काल संध्याकाळपासूनच थेंब थेंब पाऊस टपकतोय. त्यामुळे खिडकीवरील धूळ ओलसर झालीय; पण ती वाहून जाईल असा पाऊस काही पडला नाही.

आज तिसऱ्या प्रहरापासून पाऊस थांबलाय खरा; पण ढगांचं लक्षण काही ठीक नाही. अचानक पाऊस सुरू होईलसुद्धा. अशा संध्याकाळी धड घरातही मन रमत

नाही, बाहेर कुठे आश्रय मिळेल याची खात्री नाही. अशा वेळी एका ओलसर, दमट गच्चीत वेताच्या मोढ्यावर बसून दोघेजण गप्पा मारताहेत.

लहानपणी हे दोघे मित्र शाळेतून परतल्यावर याच गच्चीवर धावपळ करत खेळायचे. परीक्षेच्या वेळी याच गच्चीवर मोठमोठ्याने पाठांतर करत दोघांनी फेऱ्या मारल्या आहेत. कॉलेजमध्ये असताना संध्याकाळच्या वेळी याच गच्चीवर बसून दोघांनी जेवण केलंय आणि वाद-विवाद करण्यात रात्रीचे दोन वाजून गेले, तरी त्यांना त्याची शुद्ध उरत नव्हती आणि सकाळची उन्हं त्यांच्या चेहऱ्यावर पडून त्यांना जागवताच त्यांच्या लक्षात येत होतं की, चटईवर पडल्या पडल्याच त्यांना झोप लागली होती. कॉलेज संपल्यावर याच गच्चीवर दरमहा 'हिंदू हितैषी सभे'चं अधिवेशन होऊ लागलं. या दोघांपैकी गौरमोहन त्या सभेचा सभापती आहे. सगळे त्याला 'गोरा' म्हणूनच ओळखतात. दुसरा मित्र विनय सचिव आहे.

'गोरा' बघता बघता सगळ्यांच्यावर प्रभाव पाडू लागलाय. कॉलेजचे पंडित त्याला 'रजतगिरी' म्हणत. तो अतिशय गोरापान, पांढराफटक म्हणता येईल असा आहे. त्यात स्निग्धतेचा अंश अजिबात नव्हता असं म्हटलं तरी चालेल. त्याची उंची सहा फूट, भरदार, रुंद बांधा, वाघाच्या पंजाप्रमाणे हाताचे पंजे. स्वर असा भारदस्त, गंभीर, काहीसा कठोर की, लोक आश्चर्याने विचारायचे, हे आहे तरी काय? चेहरा मोठा, रुंद, कठोर वाटावा असा. हनुवटीची ठेवण एखाद्या दुर्गद्वारासारखी. डोळे छोटे, पण तीक्ष्ण. दृष्टी अशी की, जशी काही आपल्या अदृश्य लक्ष्यावर खिळलेली आहे; परंतु क्षणात परतून जवळच्याच एखाद्या गोष्टीवर विजेप्रमाणे आघात करू शकते. बघताक्षणी गौरमोहनला सुंदर नाही म्हणता येणार; पण त्याला बघितल्याशिवाय राहणंही शक्य नाही. लोकांच्या नजरा त्याच्याकडे उगाचच खेचल्या जातात.

गोराचा मित्र विनय साधारण बंगाल्यांप्रमाणे आहे. सुशिक्षित, सज्जन आहे. नम्र तरीही उज्ज्वल. स्वभावातील कोमलता आणि बुद्धीची प्रखरता यांच्या मिलाफाने त्याच्या चेहऱ्याला विलक्षण चमक दिलीय. कॉलेजमध्ये त्याला नेहमीच चांगले मार्क आणि शिष्यवृत्ती मिळालीय. गोरा त्याची बरोबरी करू शकत नव्हता. शिक्षणाची तेवढी आवडच त्याला नव्हती. विनयप्रमाणे त्याला एखादी गोष्ट चटकन समजत नव्हती वा त्याच्या लक्षातही राहत नव्हती. विनय जणू त्याचं वाहन बनला होता आणि आपल्या मागून कॉलेजच्या परीक्षेत पास करत त्याला आणलं होतं.

गोरा म्हणत होता, ''मी सांगतो. ऐक. अविनाश ब्राह्मणांची निंदा करत होता, त्यावरून हेच लक्षात येत होतं की, तो ठीक आहे. स्वस्थ आहे. अचानक तुला एवढं भडकायला काय झालं?''

''काय बोलतोयस तू? याबद्दल माझा काही प्रश्न असेल, याचा मी विचारही करू शकत नाही.''

''मला वाटतं, तुझ्या मनात काही तरी खोट आहे. समाजातील काही लोकांचा गट समाजाची बंधनं तोडून प्रत्येक गोष्ट उलटीच करू लागला, तर समाजातील बाकीच्या लोकांनी त्यावर विचार करणं स्वाभाविक नाही का? त्यांचं वागणं इतरांना चुकीचं वाटणारच. जे सरळ करत असतील, ते त्यांच्या नजरेत चुकीचं दिसणार. त्यांचं भलं यांच्या दृष्टीनं वाईटच असणार. मनमानीप्रमाणे समाज तोडून बाहेर पडणाऱ्यांना जी शिक्षा मिळते हीदेखील त्यातलीच एक शिक्षा आहे.''

''जे स्वाभाविक आहे, ते चांगलंच आहे असं काही म्हणता येणार नाही.''

गोरा काहीशा नरमाईनं म्हणाला, ''आमचा चांगल्याशी मतलब नाही. या जगात दोन-चार जणं चांगली राहिली तर राहिली; पण बाकीचे सामान्य राहिले, तरी पुष्कळ झालं. ज्यांना ब्राह्मण बनून बहादूरी दाखवायचीच त्यांचं सगळं कार्य अब्राह्मण लोक उलटं समजून त्यांची निंदा करणारच. एवढे कष्ट त्यांना सहन करायलाच हवेत. त्यांनी स्वत: छाती फुगवून तोऱ्यात, रुबाबात पुढे पुढे जावं आणि त्यांच्या विरोधकांनी वा:! वा:! म्हणत मागोमाग जावं, असं जगात कसं होईल? आणि झालंच तर या दुनियेचं काही भलं होणार नाही.''

''मी समाजातील एखाद्या गटाच्या निंदेबद्दल बोलत नाही. व्यक्तिगत...''

''ही समाजातील एखाद्या दलाची निंदा थोडीच आहे? ही आपल्या आपल्या विचाराची गोष्ट आहे. निंदा व्यक्तिगतच होते. अच्छा! साधू महाराज, आपण कधी निंदा केली नाहीत?''

''केलीय. खूपदा केलीय; पण त्याबद्दल मला शरम वाटते.''

गोराने उजव्या हाताची मूठ आवळत म्हटलं, ''नाही विनय. असं नाही होऊ शकत.''

विनय थोडा वेळ गप्प बसला. मग म्हणाला, ''का? तुला कशाची भीती आहे?''

''मला दिसतंय, तू स्वत: कमजोर बनत चालला आहेस.''

विनय थोडासा उत्तेजित होऊन म्हणाला, ''कमजोर?... तुला माहीत आहे माझी इच्छा असेल, तर मी त्यांच्या घरी जाऊ शकतो. त्यांनी मला निमंत्रणही दिलंय... पण मी गेलो नाही.''

गोरा म्हणाला, ''तू गेला नाहीस... पण ही गोष्ट तू विसरूही शकला नाहीस. दिवस-रात्र असाच विचार करतो आहेस की, मी त्यांच्या घरी गेलो नाही. यापेक्षा तर जाऊन येणंच चांगलं.''